# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३२२ - २३ दिनांक : - १८/०९/२०२३

## चोरी करणा-या सराईत आरोपीतांस गुन्हयातील मुद्देमालसह ताब्यात घेवुन ४ गुन्हे उघड करण्यात गुन्हे शाखा कक्ष -3 विरार यांना यश

दि.१३/०९/२०२३ रोजी १४-०० वे १५-०० वाजतच्या दरम्यान आर जे नाका, फुलपाडा, विरार पुर्व येथे सुनिल रामसुरत पाल हे त्यांचे टेम्पोत झोपलेले असताना ड्रायव्हर सिट चे बाजुचे सिटवर ठेवलेला १०,०००/- रुपये किंमतीचा मोबाईल अज्ञात चोरटयाने चोरी करून नेले बाबत विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८८१/२०२३ भा.द.वी.स. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यापासुन चोरी गुन्हयात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या

सदर गुन्हे अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपासादरम्यान तांत्रीक विश्लेषण व सदर गुन्हा हा अभिलेखावरील सराईत आरोपीत यांनी केले बाबत मिळालेल्या गोपणीय बातमीवरुन आरोपीत नामे - १) रोहन दत्ताराम उत्तेकर वय ३० वर्षे, रा. साईनाथ नगर, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर. व २) दिनेश दत्ताराम उत्तेकर वय २५ वर्षे, साईनाथ नगर, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर. यांना कौशल्यपुर्वक ताब्यात घेवुन त्यांचे कब्जातुन विविध कंपनीचे ८ मोबाईल फोन असा १,३७,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेकडुन एकणु ४ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**- उघडकीस आलेले गुन्हे -**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर कलम |
|---|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे | ८८१/२०२३ भा.द.वी.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| २ | विरार पोलीस ठाणे | ८८३/२०२३ भा.द.वी.सं. कलम ३८०प्रमाणे |
| ३ | विरार पोलीस ठाणे | ८८४/२०२३ भा.द.वी.सं. कलम ३८०प्रमाणे |
| ४ | आचौळे पोलीस ठाणे | ४४७/२०२३ भा.द.वी.सं. कलम ३७९ प्रमाणे |

नमुद आरोपीत यांचा पुर्व इतिहास पडताळुन पाहता उक्त आरोपीत विरुध्द अशाच प्रकारे मिरा भाईदर- वसई विरार आयुक्तालय येथे ०९ गुन्हे नोंद आहेत.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख, पोउपनिरी/ अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

----0000----